महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक – ३९ दिनांक :- ०२ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**सिद्धार्थनगर (पत्राचाळ) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पात्र अधिकृत सभासदांच्या पुनर्वसन सदनिकांची ०४ एप्रिल रोजी संगणकीय प्रणालीद्वारे होणार निश्चिती**

मुंबई, दि. ०२ एप्रिल, २०२५ :- गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन प्रकल्पातील आर-९ भूखंडावरील पात्र अधिकृत सभासदांना पुनर्वसित सदनिकांचे वितरण यादृच्छिक (Randomised) पद्धतीने संगणकीय सोडत प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. ही सोडत दि. ०४ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता गोरेगाव पश्चिम येथील एस व्ही रोड वरील सरदार वल्लभ भाई सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर यांनी आज दिली.

गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन प्रकल्पातील आर-९ भूखंडावरील ६७२ अर्धवट पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत रु २४० कोटी खर्च करून पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पास दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी भोगवटा प्रमाण पत्र प्राप्त झाले आहे. डीसीपीआर नुसार ४१२ वाहन तळ देणे गरजेचे होते परंतु म्हाडा मार्फत प्रत्येक सदनिकेकरिता एक वाहन स्थळाची सुविधा पुरविण्याच्या हेतूने एकूण ६८६ पार्किंग पुरविण्यात येत आहे. तसेच पात्र सभासदांना जानेवारी २०१८ पासून आजतागायत रु १२९ कोटी भाडे स्वरुपात अदा करण्यात आले आहे. या पात्र अधिकृत सभासदांना पुनर्विकास प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या इमारतीमधील दिल्या जाणाऱ्या पुनर्वसन सदनिकेचा क्रमांक, इमारतीचा क्रमांक, इमारतीची विंग, इमारतीतील सदनिकेचा मजला निश्चित करण्यात येणार आहे. सदनिकांचा क्रमांक यादृच्छिक (Randomised)पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे निश्चित करण्यात येणार आहे. त्यासाठी RAT (Random Allocation of Tenement) या प्रणालीचा वापर करण्यात येणार असून ६६३ सदनिकांची सोडत या प्रणालीद्वारे काढण्यात येणार आहे.

मंडळातर्फे सर्व सभासदांना आवाहन करण्यत येत आहे की शासनमान्य छायाचित्र ओळखपत्रासह सोडत कार्यक्रमामध्ये उपस्थित राहावे. त्याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने भ्रमणध्वनी (mobile phones) अथवा कोणतीही इलेक्ट्रोनिक उपकरणे सभागृहात आणता येणार नाही. तसेच मंडळातर्फे जाहीर करण्यात आले आहे की ४ एप्रिल रोजी सदनिका निश्चिती झाल्यानंतर, पात्र लाभार्थ्यांना मुंबई मंडळ गोरेगाव विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातून दि. ०७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सदनिका ताबा पत्र व चाव्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा


सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial